महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग, मंत्रालय,
४ था मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
nirmal.chaudhari@gov.in

क्रमांक : टिपीबी-४३१९/७७२/प्र.क्र.८/२०२०/नवि-११ दिनांक : २३ /१०/२०२०.

प्रति,
**आयुक्त,**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ४(३) अन्वये स्पष्टीकरण.

Applicability of Inclusive Housing as per Reg.15 of DCPR-2034

संदर्भ :- १) शासन नगर विकास विभागाचे समक्रमांकाचे पत्र दि. १३/०२/२०२०.
२) मे. PEATA चे दि. ४/०९/२०२० व दि. १५/०९/२०२० रोजीची शासन नगर विकास विभागास प्राप्त पत्र.

महोदय,

बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १५ मधील Inclusive Housing च्या तरतूदी संबंधी विनियम ४(३) अन्वये संदर्भ क्र. १ चे पत्राद्वारे आपणास स्पष्टीकरण कळविण्यात आले आहे. Inclusive Housing च्या तरतुदी लागू करण्याबाबत आणखी स्पष्टता करण्याबाबत मे. PEATA यांनी संदर्भ क्र. २ चे पत्राद्वारे शासनास विनंती केली आहे.

अर्जदार यांनी केलेली विनंती विचारात घेता, यापूर्वी शासनाने दि. १३/०२/२०२० रोजीचे पत्राद्वारे दिलेले स्पष्टीकरण कायम ठेऊन विनियम १५ च्या तरतुदीच्या अनुषंगाने आणखी स्पष्टता करण्यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ४(३) अन्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण कळविण्याबाबत मला आदेश आहेत.:-

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ लागू असताना तेव्हाचे प्रचलित नियमावलीनुसार बेसिक झोनल चटई क्षेत्र निर्देशांकानुसार ( उपनगरात १.०० तर शहरात १.३३) मंजूरी घेण्यात येऊन तसेच दि.८/११/२०१३ रोजीची शासन अधिसूचना निर्गमित होणेपूर्वी बांधकाम प्रारंभ परवानगी (CC) देण्यात आलेल्या विकास प्रस्तावात इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेल्या प्रकरणी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ लागू झाल्याने बेसिक चटई क्षेत्र निर्देशांकामधील शिल्लक ०.१५ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबत अथवा, तसेच अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक, टिडीआर चा वापर प्रस्तावित करुन विकास प्रस्ताव महापालिकेकडे सादर केल्यास अशा प्रस्तावास देखील Inclusive Housing च्या विनियम १५ च्या तरतुदी लागू होणार नाहीत. तथापि, भविष्यात अशा जमिनीवर पुर्नविकासाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावेळी अशा पुर्नविकास प्रस्तावास तेव्हाचे नियमावलीनुसार विनियम १५ सहीत इतर तरतुदी लागू राहतील.

आपला,

(निर्मलकुमार पं. चौधरी)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीस्तव :-** १) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) प्रमुख अभियंता ( वि.नि.), बृहन्मुंबई महानगरपालिका.
३) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
४) निवडनस्ती (नवि-११)